वीरवंदन !

# पोवाडा ............ :३४:

धन्य धन्य तुम्हि रणवीरांनो, कमाल केली शौर्याची । क्षात्रधर्मही डोलुं लागला करा सांगता यज्ञाची ।। सेनासागर खवळुनि उठला लाटा भिडल्या गगनाला । सेबर पॅटन पार बुडविले शत्रू मिळविला मातीला ।। गर्विष्ठांचें नाक कापलेत, अहंकार जिरुनी गेला । अशा लढाया कुणि ना केल्या धन्य धन्य रे तुम्ही झाला ।। पराक्रमांच्या तेजबलानें शत्रू चळचळा कापविला । दुनिया सारी दिपुनी गेली दिव्य पराक्रम तुम्ही केला ।। हिंदु मुस्लिम शीख पारशी ख्रिश्चन एकच या काळीं । पांच अग्नि जणुं धडकत उठले करती अधर्माची होळी ।। विळखा घालून प्राणघातकी असे कालिया बसलेला । बाळकृष्ण तुमच्या रूपानें आज जणुं काय अवतरला ।। शिवाजी राजे आणि मावळे कसे झुंजले त्या वेळा । दर्शन त्यांच्या पराक्रमाचें आज घडविलें आम्हांला ।। शीख धर्मगुरु गोविंदांचें दर्शन घडलें या वेळा । इब्राहिमखान गारदी जणुं पानपतावर अवतरला ।। अधीर झाले होते आत्मे शिवाजी बाजीरावांचे । झांशीवाली तात्या टोपे लोकमान्य गांधीजींचे ।। तृप्त जाहले असतिल सारे ऐकुनिया तुमच्या गाथा । "धन्य धन्य शाब्बास," असे हे बोल बोलती यश गाता । **धनंजयाची** निशाणबाजी **भीमगदेचा** तो टोला । **मारुतीची** ती झेप भयंकर दिसली आमुच्या डोळ्याला ।। तारे **सारे** फिक्कट झाले तुमच्या अद्भुत तेजानें । सूर्य चंद्रही सचिंत झाले तुमच्या तेजःकिरणानें ।। सिंहहि गेले भांबावुन ते गरुडहि थिजले जागेला । पराक्रमाचा वीररसाचा निनाद भिडला गगनाला ।। दिव्य लोकांतुन सुमनें उधळित असतिल पूर्वज या वेळा । चला पुढें तुम्ही झुंजारांनो, समरयज्ञ हा पूर्ण करा ।। उज्ज्वल यश हें ऐकुनि तुमचे कान निवाले या वेळा । गात पवाडे धवल यशाचे **पांडुरंग** तन्मय झाला ।। जी ।। १ ।।

रचना–१७–९–६५.

वंदन करूं शूरवीरास !

# पोवाडा ............ :३५:

## चौक १ ला

स्वार्थाचा होम ज्यांनीं केला । जीव वाहिला । राष्ट्रकार्याला । लोकसेवेचा घेतला ध्यास । जणुं काय दीप झाला लोकास । वंदन करूं शूरवीरास ।। जी ।। चाल ।। झालं समुद्राचं मंथन । हालाहल झालं निर्माण ।। जी ।। सारं जग गेलं घाबरून । रक्षील विश्वाला कोण ? ।। जी ।। शंकर आले धावून । हालाहल केलं प्राशन ।। जी ।। शिवकंठ गेला भाजून । नीळकंठ झालं अभिधान ।। जी ।। चाल ।। अंगाचा दाह जाहला । नागाचा विळखा कंठाला । मस्तकीं धरलं चंद्राला । स्मशानांत थंडशा जागीं घेतला आसरा ।। जी ।। वैराग्यमूर्ति ही खरी । दिसे भूवरीं । शांति ज्या वरी । ज्यानं सुखी केलं साऱ्या जगतास । जगाला ज्याचा पूर्ण विश्वास । वंदन करूं शूरवीरास ।। १ ।।

● ●

## चौक २ रा

राज्य लाथाडुन वीर चालला चौदा वर्सं वनवासाला । राक्षस सारे ठार मारिले धर्ममार्ग तो राखियला ।। जी ।। भावासाठीं आत्मसुखाचा होम जयानं हो केला । धन्य लक्ष्मण, धन्य भरतही धन्य धन्य या जगिं झाला ।। जी ।। अचाट कामें शुद्ध मनानें रामास्तव ज्यानें केलीं । पवनपुत्र अंजानितनयाला नमनांजलि मी वाहियली ।। जी ।। देवकिनंदन धर्मरक्षणा नंदाच्या घरिं अवतरला । दुष्टांचा संहार करुनिया कर्मयोग

तो शिकाविला ॥ जी ॥ वृत्रासुर तो दैत्य माजला । पीडत होता त्रैलोक्याला । जनतेचें रक्षण करण्याला । दधीचि ऋषिंनीं हाडें देउनी देवेंद्राला सुसज्ज केला । अन् वृत्रासुर ठार करविला ॥ चाल ॥ मुनी दधीची धन्य जाहले देह दिला जनकार्याला । वंदन करुं यां चला बंधुंनो, अशा महात्मा पुरुषाला ॥ २ ॥

● ●

## चौक ३ रा

सत्त्वरक्षणा त्रिपादभूमी दान दिली बळि राजानं । शब्द दिलेला परत घेइना, धन्य धन्य भूपतिरमण ॥ राज्य दिलं स्वप्नांत दान परि पूर्ण केलं ज्यानं वचन । हरिश्चंद्र राजाला आतां करूं सर्वहि त्या नमन ॥ चाल ॥ भगवान् बुद्धानीं दयाधर्म सांगितला ॥ जी ॥ महावीर जैनांनीं तोच धर्म दाखविला ॥ ते बसवेश्वरही वंद्य भरतभूमीला ॥ येशु खिस्त महात्मा याचसाठीं अवतरला ॥ जी ॥ झरतुष्ट्र महात्मा धन्य होउनी गेला ॥ जी ॥ अहुरमज्द दिव्य पुरुषानं लोक उद्धरला ॥ जी ॥ तो पैगंबरहि याचसाठीं अवतरला ॥ गुरु नानक गुरुंनीं विश्वधर्म सांगितला ॥ जी ॥ किति संत महात्मे करती याच कार्याला ॥ जी ॥ चाल ॥ देशोदेशीं जन्म घेउनी सुपंथ दर्शन ते करिती । धन्य महात्मे धन्य पुरुष ते धन्य जाहले भूवरती ॥ ३ ॥

● ●

## चौक ४ था

राष्ट्राचं करण्या रक्षण । कैकांनीं केलं बलिदान ॥ जी ॥ थयथया जुलमी सैतान । जेव्हां जेव्हां आले नाचून ॥ जी ॥ तेव्हां तेव्हां झुंज देऊन । जनतेचं केलं रक्षण ॥ जी ॥ धारातीर्थी पडले मरुन । वीरांचं आलं मरण ॥ जी ॥ अशा शूरांना करुन वंदन । होऊं या धन्य आपण



॥ जी ॥ चाल ॥ बाप्पा रावळ पृथ्वीराजही प्रतापराणा दाहीर । देवगिरीचा रामरायाहि वंद्य जाहले रणशूर ॥ जी ॥ शिवाजी, ताना, मुरारबाजी, बाजीप्रभुही ते थोर । तसे सदाशिवरावभाऊही पानपतीं पडले वीर ॥ जी ॥ धन्य जनकोजी विश्वासरावहि झुंजून पडले रणशूर । अभिमन्यूची आठवण देती धन्य धन्य हे रणवीर ॥ जी ॥ राणी लक्ष्मी झांशीवाली तात्या टोपे झुंजार । फडके कर्वे चाफेकरहि धन्य जाहले हे वीर ॥ बाबु गेनुची निधडी छाती कवटाळी ती मरणाला । राष्ट्रासाठीं प्राण अर्पिले धन्य धन्य ही नरमाला ॥ जी ॥ लोकमान्य टिळकांनीं राष्ट्रा निर्भयतेचा धडा दिला । देशासाठीं देह झिजविला वंदन करुं या आम्हीं त्याला ॥ जी ॥ वंद्य महात्मा गांधीजींनीं सत्य अहिंसा मंत्र दिला । जागें केलें राष्ट्र खडबडून वंदन करुं या हो त्याला ॥ जी ॥ चाल ॥ ज्यांनीं ज्यांनीं स्वार्थ सोडला । देह अर्पिला लोकसेवेला । जाळुन टाकले ज्यांनीं कुविचार । ज्यांनीं दुष्टांचा केला संहार । दीन दुबळ्यांचे झाले आधार । त्याना त्याना **पांडुरंग** नमणार ॥ ४ ॥

रचना–२३-९-६३.